जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.१०/०१/२०२५**
**दि.०९/०१/२०२५ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे २१/२०२५ भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४), ३०५ अ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय २६ वर्षे रा. कर्वेनगर, पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०१/२०२५ रोजी सायं २०/०० वा ते दि.०८/०१/२०२५ रोजी स.०९/४५ वा.चे दरम्यान प्लॉट नं. ११, एकतत्व, वेदांतनगर, कर्वेनगर, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नातेवाईकाचा राहता बंगला कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते बंगलाचे खिडकीची काच व ग्रील कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील २,४०,०००/-रु.किं.चे किंमतीचे सोने व चांदीचे दागिने व कॅमेरा असा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संजय नरळे,मो.नं.९६६५४४८७८१ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ०८/२०२५,भा.न्या.सं कलम ३१९(२),३१८(४),३१६(५) माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय ३८ वर्षे रा. एरंडवणे,म्हात्रे पुलाजवळ,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक वापरकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. ०६/११/२०२४ ते दि. १०/१२/२०२४ ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी ग्रुपवर वारंवार नफा होत असल्याबाबत मेसेज करुन शेअर खरेदी करण्याचे बहाण्याने त्यांचे वेगवेगळ्या बँक अकाउंट मध्ये गुंतवणुक करण्यास लावुन गुंतवणुक केलेल्या पैशाबाबत काही एक परतावा व मुळ रक्कम परत न देता फिर्यादी यांची ४३,७८,७००/-रु.ची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक श्री. राऊत मो नं ९७६५२१११०० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे १७/२०२५, भा.न्या.संहिता कलम १०६ |
| **फिर्यादी** | महेश भोंगळे, पोलीस अंमलदार, चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | एक ठेकेदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. ०९/०१/२०२५ रोजी ०९/२९ वा. सारथी हॉस्पीटल पुणे येथे |
| **तपशिल** | चंदननगर पो स्टे अ.मयत रजि.नं. ०७/२०२५,भा.ना.सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम ठेकेदाराने त्याचे वर नमुद ठिकाणी पेन्टींगचे काम करित असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी,सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना, त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार मयत इसम अमरनाथ भागीरथी भारती, वय ५४ वर्षे रा.संजीविनी हॉस्पीटलच्या जवळ उत्तमनगर पुणे हा सीडी वरुन त्याचा तोल जावुन,तो वरून खाली पडुन,त्यांचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन,तो डॉक्टर तपासणीपुर्वीच |

मयत झाला.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. प्रशांत माने, मो.नं ७३५०७७८१००

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** स्वारगेट पो स्टे १३/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३(२)

**फिर्यादी** एक महिला, वय ५१ वर्षे रा.सुसगाव,पुणे.

**आरोपीत** अज्ञात (अटक नाही )

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०९/०१/२०२५ रोजी सकाळी ०९/०० वा.चे सुमा.सुसगाव येथुन पीएमटी बसने कात्रज येथे येवुन त्यानंतर कात्रज येथुन पीएमटी बसने स्वारगेट येथे येवुन कोल्हापुर बसस्टॉप येथे प्रवासा दरम्यान

**तपशिल** यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,नमुद ठिकाणी सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे खांदयाला अडकविलेल्या हॅन्डपर्सचे आतील कप्प्यामधुन एकुण ०१,१०,००/-रु.किं.चे सोन्याचे दागिने पर्स मधुन काढुन चोरी करून नेले आहे.

**त.अंमलदार** श्रेणी पो.उप.निरी.शैलेश आल्हाटे मो.नं ९८२२५०३५८१

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** वानवडी पो स्टे १६/२०२५, भा.न्या.सं.कलम ३०३

**फिर्यादी** एक महिला वय ६२ वर्षे,रा.कॅम्प,पुणे.

**आरोपीत** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०७/०१/२०२५ रोजी दुपारी १५/३० ते १५/४५ वा.चे.दरम्यान वेस्टेंड टॉकीजचे बसस्टॉप वरुन पिंपळे गुरव ते हडपसर ची बस पी.एम.पी.एल.हडपसर या बसमध्ये प्रवासादरम्यान

**तपशिल** यातील फिर्यादी हया पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,नमुद ठिकाणी सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पर्स मधील रोख रक्कम ३०००/-रू.व २९,२५०/रु.किं.ची सोन्याची अंगठी असा एकुण ३२,२५०/-रू. किं.चा ऐवज पर्स मधुन काढुन चोरी करून नेला.

**त.अंमलदार** सहा.पो.फौज. कुंभार मो.नं. ९८३३४२५१४

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** विमानतळ पो स्टे २६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०६

**फिर्यादी** एक इसम वय ३५ वर्षे रा.वानवडी,पुणे.

**आरोपीत** अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** माहे नोव्हेंबर २०२४ ते दि.१८/१२/२०२४ रोजी सायं.०५/३० वा. दरम्यान लिटल हाय बार ॲन्ड रेस्टॉरंट डी.वाय.पाटील कॉलेज रोड, लोहगाव, पुणे येथुन

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे नमुद हॉटेल मध्ये मॅनेजर म्हणुन काम करणाऱ्या इसमाने नमुद ठिकाणाहून एकुण ८,३५,३५७/-रुपये किं.चा.फिर्यादीच्या हॉटेलमधील किचन व स्टोअर रुममधील वस्तु, एसी, फ्रीज, कटलरी, क्रॉकरीज व साऊंड सिस्टीम असे सामान चोरी करुन घेवुन गेला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी.संतोष शिंदे मो.नं ९९२३४३३८२०

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**